Exh. 15

रे. क. नं. २०/२०२६

मे. दिवाणी न्यायाधीशसो, क. स्तर, कागल
यांचे कोर्टात.....

शहाजी संतु उर्फ संतराम पोवार — वादी

विरूध्द

अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार — प्रतिवादी
वगैरे

यातील प्रतिवादी नं. १ व ३ यांच्यातर्फे वादी यांच्या दाव्यास कैफीयत व तुर्तातुर्त मनाई अर्जास लेखी म्हणणे पुढील प्रमाणे —

१. वादी यांचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज साफ खोटा, चुकीचा, लबाडीचा असून तो कायद्यातील तरतुदी प्रमाणे नाही. त्या कारणाने वादींचा दावा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

Order
Read and
Recorded.
C.J.J.D.Kagal
Dt.24.3.26

२. वादी यांनी दाव्याच्या कॉज टायटलमध्ये त्यांचे वास्तव्य दावा मिळकत नगर भुमापन गट नं. ४२४ सोनाळी असे असलेचे नमुद केले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये सुरू केलेल्या बांधकामा बाबतची संपूर्ण माहिती अगदी सुरूवाती पासून म्हणजे प्रस्तुत

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

प्रतिवादींनी ऑक्टोबर २०२५ मध्ये बांधकाम सुरू करणार असले पासून त्यांना पुर्ण माहिती व कल्पना आहे. असे असता केवळ प्रतिवादी यांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असताना हेतूपुरस्कररित्या व आकस हेतूने ते बंद पाडण्याच्या दृष्ट हेतूने प्रस्तुतच्या दाव्याची रचना केलेली आहे. त्यामुळे वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादींनी दावा मिळकतीचे दावा अर्जी कलम १ मध्ये दिलेले वर्णन प्रस्तुत प्रतिवादी यांना अमान्य व नाकबुल आहे. तशा वर्णनाची मिळकत अस्तित्वात असल्याबाबतची बाब वादींनी पुराव्यानिशी शाबीत करावी.

४. वादी यांच्या दावा अर्जी कलम २ मधील मजकूर म्हणजे " यातील वादी व प्रतीवादी नं. १ ते ३ ———————— वादी व प्र. वादी नं. १ ते ३ यांचा पुतण्या आहे." हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. प्रतिवादी नं. ४ मयत चंद्रकांत संतराम पोवार यांना पत्नी पुषा चंद्रकांत पोवार या कादेशीर सरळ वारस असून सदर दावेत त्यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ न केलेने सदर दावेस व मनाई अर्जास सी.पी.सी. ऑ १ रूल ९ चे तरतुदीची बाधा येत असलेने सदरचा मुळ दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज चालणेसच पात्र नसलेने सबब तो नामंजूर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

५. वादी यांच्या दावा अर्जी कलम ३ व ४ मधील मजकूर म्हणजे '' सदरचे सोनाळी, ता. कागल जि. कोल्हापूर येथील नगर भूमापन गट नं. ४२४........................ वाडवडीलार्जीत पुर्वीचे २ खोल्यांचे घर आहे.'' हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. दावा अर्जी कलम ३ मध्ये नमुद केलेले सदर सोनाळी, ता. कागल जि. कोल्हापूर येथील नगर भुमापन गट नं. ४२४ चे क्षेत्र ३३.७० चौ मी. हे सन १९८२ पर्यंत संतराम तुकाराम पोवार म्हणजे यातील वादी व प्र. वादी १ ते ३ यांचे वडील व प्र. वादी नं. ४ यांचे आजोबा आहेत. सदरचे घर हे सन १९८२ पर्यंत संतराम तुकाराम पोवार यांचे नावे होते. त्यांच्या हयाती नंतर एकत्र कुटूंब म्हणून मोठे भाउ चंद्रकांत संतु पोवार ( चांभार ) यांचे नाव सन १९८३ साली सदर घर मिळकतीस मालकी सदरी लागले. चंद्रकांत संतु पोवार हे दि. ०९/०३/२०१६ इ रोजी मयत झाले. तदनंतर वरील वादी व प्र.वादी नं. १ ते ३ यांची नावे सदर मिळकत पत्रीकेस दि. ०४/११/२०२५ इ रोजी मालकी कोष्टकी लागलेली आहेत. हे वादी यांचे कथन कोणत्याही पुराव्या शिवाय असे असून ते धडधडीत खोटे असे आहे. वादी यांच्या कलम ४ मधील मजकूर सदर घरामध्ये सध्य परिस्थितीमध्ये वादी व प्रतिवादी नं. १,२ व ४ हे कायम स्वरूपी वास्तव्यास आजतागायत आहेत. सदरचे घर हे जुनी विट,दगड,माती यांचे बांधलेले

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

वडिलार्जीत पुर्वीचे २ खोल्याचे घर आहे हे वादी यांचे कथन साफ साफ खोटे, चुकीचे, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारे असे असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुण एक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. वास्तविक वादी व प्रतिवादी यांचे मध्ये संतराम तुकाराम पोवार हे सन १९८२ मध्ये मयत झाले नंतर व चंद्रकांत संतु पोवार यांचे एकूप म्हणून सर्व मिळकतीला नावे नोंद झाले. परंतू चंद्रकात पोवार यांनी सन १९९५ मध्ये सर्व मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे मध्ये सरस निरस मानाने तोंडी वाटण्या करून दिलेल्या होत्या व आहेत. त्या प्रमाणे वादी व प्रतिवादी हे त्या तोंडी वाटपाप्रमाणे आपआपल्या हिस्सेप्रमाणे जमिनीचा मालकी हक्काने कब्जा घेवून वहीवाट करत आहेत. त्या सदर तोंडी वाटपा प्रमाणे मिळकत नं. ४२४ ही मिळकत अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार यांना त्यांचे कब्जेमध्ये वाटप करून देते वेळी दिलेली होती व आहे ती आजअखेरपर्यत त्यांचे कब्जे वहिवाटीमध्ये देखील आहे.

६. वादी यांच्या दावा अर्जी कलम ५ मधील मजकूर म्हणजे " प्रस्तुत दावेचे कामी वादी--प्रतिवादी यांची वारस वंशावळ खालीलप्रमाणे-------------------------------------येणेप्रमाणे प्रस्तुत दावेचे कामी वारस वंशावळ असे." हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

प्रतिवादी नं. ४ मयत चंद्रकांत संतराम पोवार यांना पत्नी पुषा चंद्रकांत पोवार या कादेशीर सरळ वारस असून सदर दावेत त्यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ न केलेने सदर दावेस व मनाई अर्जास सी.पी.सी. ऑ १ रूल ९ चे तरतुदीची बाधा येत असलेने सदरचा मुळ दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज चालणेसच पात्र नसलेने सबब तो नामंजूर करणेत यावा.

७. वादी यांच्या दावा अर्जी कलम ६ ते ८ मधील मजकूर म्हणजे ''सदर घर मिळकत सोनाळी, ता. करवीर जि. कोल्हापूर नगर भुमापन गट नं. ४२४ ———————————— प्र वादी नं. १ ते ४ यांना बांधकाम करण्याबाबतची परवानगी देणेत आलेली नाही.'' हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. सदरची मिळकत ही फार वर्षापूर्वीची असून त्या मिळकतीच्या सर्व भिंती हया अतिशय जीर्ण झालेल्या होत्या मागील बाजूची भिंत ही जीर्ण होवून पडलेली देखील होती व आहे. सदर घर मिळकतीचे कैलारू छत देखील पावसाळयामध्ये पाणी आत येवून खराब झाले असल्याने ते कधीही पडण्याच्या अवस्थेत होते त्यामुळे प्रतिवादी नं १ यांना नाईलाजाने पूर्ण घर काढून जमीन लेवल करून नवीन घर बांधणे भाग पडले अशी वस्तुस्थिती आहे. वादीला या सर्व गोष्टीची माहिती आहे असे असताना प्रतिवादींना नाहक त्रास देणेच्या उद्देशाने

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

वादीने सदरचा दावा व मनाईचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ माहे जून पासून गावातच दुस—याच्या घरी भाडयाने राहत आहेत याची माहिती वादीस आहे. घर पाडून बाधल्याशिवाय प्रतिवादीस दुसरा कोणताही पर्याय नाही व गेली बरीच वर्षे प्रतिवादी वाद मिळकतीमधील स्वतःचे मालकी वहिवाटीच्या मिळकतीमध्ये राहत होते वादीला याची प्रत्यक्षात माहिती होती वा आहे. वादीने त्यासंबधी कधीच कोणाकडे तक्रार केली नव्हती व नाही. कारण वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सन १९९५ इ. पासून तोंडी वाटण्या झाल्या होत्या त्या सर्वांनाच मान्य व कबुल होत्या. त्यामुळे वादीला त्यासंबधी आता मे. कोर्टात दाद मागता येणार नाही. वादी यांच्या दावा अर्जी कलम ६ मधील मजकूर म्हणजेच सदरचे घर हे अतिशय जुने आहे त्यामध्ये वादी व प्रतिवादी नं. १,२ व ४ हे कायम स्वरूपी राहण्यास आहेत. अशा परिस्थितीमध्ये यातील वादी हे प्र.वादी नं. १ यांना म्हणाले की ''तुम्ही का घर पाडताय आपण सध्या त्या घरात राहणेस आहे. सदरचे घर पाडल्यास आपण कोठे रहायचे कोठे जायचे'' असे म्हणाले असता प्र.वादी नं. १ ही प्र.वादी नं. २ ते ४ यांच्या मदतीने यातील वादीच्या अंगावर धावुन आली व शिवीगाळ करून ठार मारहाण्याची धमकी देवु लागली. तसेच वादींना धाकधपटशहा करून व शिवीगाळ करून वादी व त्यांचे कुटुंबियांना बेकायदेशीरपणे घरातुन हाकलून लावले. सध्य परिस्थितीमध्ये वादी व त्यांचे कुटुंबिय हे अक्षरशः रस्त्यावर आलेले आहेत. त्यांना राहणेसाठी इतर

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

कोणतेही घर किंवा वास्तव्यासाठी जागा नाही. हे वादी यांचे कथन साफ साफ खोटे, चुकीचे, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारे असे असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. मुळातच वादी सदरची मिळकत ही प्रतिवादी नं. १ यांचे कब्जे वहिवाटीमध्ये आहे. प्रतिवादी नं. १ यांचा विवाह झाला नसून हिंदू धार्मिक रूढी परंपरेनुसार त्यांचा विवाह हा हिंदू देवांचे सोबत झालेला आहे. त्या देवीची दासी व परम भक्त असून त्यांचा सदर मिळकतीमधील घरामध्ये देवी यल्लमा चे जग ( छोटे मंदिर ) आहे. त्या एकटयाच तिथे राहत असून तेथे भावीक व भक्तगणांची दर्शनासाठी सारखी गर्दी असते. त्यामुळे सदरची मिळकत ही कोणा भक्तगणांवर पडून कोणतीही वाईट घटना घडू नये तसेच सदची मिळकत ही जीर्ण झाली असल्याने काही भक्तगणांनी पुढाकार घेवून प्रतिवादी नं. १ यांची आर्थिक परिस्थिती नसताना देखील मदत करून घराचे बांधकाम करून देत आहेत. वादी हे कधीही सदर मिळकतीमध्ये राहण्यास नव्हते व नाहीत. प्रतिवादी नं. २ हे आपल्या कुटुबिंयान समवेत मुंबई येथे राहण्यास आहेत. प्रतिवादी नं. ४ हे देखील आपल्या आई सोबत कोल्हापूर येथे राहण्यास आहेत. तर वादी हे त्यांच्या वाटपात आलेली गाव. शिरोली ता. हातकणंगले जि.कोल्हापूर येथील मिळकतीमध्ये बांधलेल्या सर्व सोईनयुक्त अशा इमारतीमध्ये बरेच वर्षापासून आपल्या कुटुंबियांन सोबत राहण्यास होत व आहेत. असे असता दावा मिळकतीमधील

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

कब्जेवहिवाटीस प्रतिवादी नं. १ ते ४ यांची वादींच्या सहमतीने आजअखेर शांततामय कब्जेवहिवाट सुरू आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रतिवादी यांनी वादी यांच्या मालकीच्या मिळकतीत डागडुजी किंवा फेरबदल करू नये अशी मनाई मागण्याची तरतूद स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट मध्ये नाही. त्यामुळे वादींच्या दाव्यास असे कोणतेही कारण घडलेले नसल्याने वादींनी हा खोटा दावा दाखल केल्याचे सुस्पष्ट आहे. खरोखरीच प्रस्तुत प्रतिवादीनी वादींच्या मालकीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे/स्वरूपाचे बांधकाम केव्हाही करण्याचा प्रयत्न केला असता तर प्रतिवादींनी त्यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये ज्यावेळी बाधकामाबाबत चर्चा सुरू होती त्याचवेळी वादींनी त्यास हरकत करून प्रतिवादींना बांधकाम न करण्याबाबत सांगितले असते. मात्र गेली ६ महिने प्रतिवादी आपल्या मालकीच्या मिळकतीमध्ये बांधकाम करीत असताना वादींनी कोणतीही तक्रार केली नाही. मात्र अलीकडे बांधकाम हे खिडकी लेव्हला आले असताना वादींनी हा खोटा दावा दाखल करून या प्रतिवादींना नाहक त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे. याकारणा वरून सुध्दा वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज कोर्ट खर्चासह फेटाळण्यात यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

८. वादींनी दावा अर्जी कलम ९ मध्ये दाव्यास नमुद केलेले कारण साफ खोटे, चुकीचे, काल्पनिक असे असून वादींनी नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. जे काही घडलेचे नमूद केले आहे ते साफ खोटे असून केवळ प्रस्तुत दाव्यास काहीतरी कारण असावे म्हणून त्यांनी तसे कारण नमुद केले आहे. मुळातच वादींच्या दाव्यास कोणतेही कारण घडले नसल्या कारणाने वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज नॉन कॉज ऑफ ॲक्शनच्या कारणावरून नामंजूर करणेत यावा.

९. दाव्याचा तपशील, केलेली अकारणी ही पूर्णपणे चुकीची असून ती कायद्यातील तरतुदीप्रमाणे अशी नाही.

१०. वादींनी दावा अर्जी कलम ११ मध्ये विनंती केल्याप्रमाणे जशा दादी मागत आहेत तशा दादी त्यांना मुळातच मागता अगर देता येणार नाही अगर देता देखील येणार नाहीत. याकारणाने सुध्दा वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाईचा अर्ज फेटाळणेत यावा.

११. वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने व दाव्यातील कथने ही एकसारखीच असल्याने व दाव्यातील संपूर्ण कथने व मजकूर प्रस्तुत प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेला असल्याने तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने स्वतंत्ररित्या नाकारलेली नाहीत तथापि त्यातील संपूर्ण मजकूराचा व कथनांचा प्रस्तुत प्रतिवादी स्पष्टपणे इन्कार करतात. केवळ पुनरावृत्ती होवू नये

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

या हेतूने प्रतिवादीनी वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथनांच्या अनुशंगाने या कैफीयती मध्ये स्वतंत्रपणे कथने करून ती नाकारलेली नाहीत. तथापि प्रस्तुत प्रतिवादी वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील संपूर्ण मजकूराचा स्पष्टपणे इन्कार करतात.

१२. वादींना सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजू व सोयीचे समतोलत्व वादींच्या लाभामध्ये नाही तर ते प्रतिवादी यांच्या लाभामध्ये आहे. वादींनी मा. न्यायालयापासून अनेक बाबी लपवून ठेवून या खोटया दाव्याची रचना केलेली आहे. वादी न्यायालयामध्ये स्वच्छ हाताने आलेले नाहीत. त्यांची वर्तणूक प्रामाणिक हेतूची नाही. वादींनी मा. न्यायालयापासून खऱ्या गोष्टी लपवून ठेवून व खोटी कथने करून वादीच्या दावा मिळकती मध्ये रहिवास करत असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल न करता केवळ मालमत्ता पत्रकात नाव असले गोष्टीचा गैरफायदा घेवून प्रस्तुत प्रतिवादींचे बांधकाम सुरू असल्याच्या कारणावरून त्यांनी वादींच्या मिळकतीमध्ये बांधकाम करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे असे केलेले कथन कोणत्याही पुराव्या शिवाय असे असल्या कारणाने वादींची दाव्याच्या कामी व तुर्तातूर्त मनाई अर्जाच्या कामी मागितलेली दाद मुळातच त्यांना मंजूर करता येणारी नाही. या सर्व कारणावरून सुध्दा वादींचा दावा व मनाईचा अर्ज फेटाळणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

१३. वादींच्या मागणीप्रमाणे प्रतिवादींच्या विरूध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश झाल्यास प्रतिवादींच्या कायदेशीर कृत्याला प्रतिबंध केल्यासारखे होणार आहे. प्रतिवादी कायदा पाळणारे व मानणारे इसम असून ते अतिशय गरीब आहेत. त्यांनी बरीचशी रक्कम खर्ची करून घर बांधकाम करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादींच्या कायदेशीर कृत्यास वादींना ढोबळमानाने खोटी, चुकीची कथने करून व तथाकथित कथने करून मनाई सारखी ऐच्छीक दाद मागणी केली आहे तशी ती त्यांना कायद्याने मागता अगर देता येणार नाही.

१४. प्रस्तुतचा दावा हा केवळ वादी हे खटाटोपी, व्यापक रणारे इसम असल्याने खोटया दाव्याची रचना करून वादींनी प्रतिवादींना नाहक मानसिक, आर्थिक, शारीरीक त्रासामध्ये टाकले आहे. त्यामुळे वादींनी केलेल्या त्रासापोटी वादी हेच खोटे कोर्ट केसीस मे. कोर्टात दाखल करतात व विनाकरण प्रतिवादींना सर्वतोपरी त्रास देण्याचा प्रयत्न करतात हे प्रस्तूत दावा दाखल करून वादीने शाबित केले आहे. वादी व त्यांचेतर्फे सर्व इसमांनी उपस्थित केलेल्या वादामुळे भांडणतंटयामुळे प्रतिवादी यांना वारंवार पोलीस स्टेशन, तहसिलदार ऑफिस, कागल न्यायालय व अन्य ठिकाणी वेळोवेळी पैसे खर्च करून यावे लागते. तसेच वादींनी प्रतिवादी यांचे चालू घराचे बांधकाम पाडलेले असून सर्व साहित्याची मोडतोड देखील केलेली आहे हया वादी यांच्या गैरकृत्यामुळे प्रतिवादी हे आर्थिक अडचणीत आले आहेत. या

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

सर्व गैरकृत्यामुळे वादींविरूध्द कॉम्पेन्सेटरी कॉस्ट रक्कम रू. २,००,०००/— इतकी रक्कम देणेबाबत आदेश होणे आवश्यक आहे. या शिवाय अशा प्रकारची खोटया दाव्यांची रचना करून खोटी कारणे देवून वेगवेगळया कारणाने बनावट दावे वादी ( Vexatious Litigation ) करत असून त्यामुळे मे. कोर्टाचा वेळ वाया जात आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा केवळ Abuse Process of Law आहे. त्यामुळे दावा खर्चासह नामंजूर होवून कॉम्पेन्सेटरी कॉस्ट मिळणे न्यायाचे दृष्टीने योग्य आहे.

येणेप्रमाणे या व अन्य कारणांचा विचार होवून वादींचा दावा व तुर्तातुर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा ही विनंती. जरूर तर जादा व पुरवणी कैफीयत दाखल करणेस परवानगी असावी.

येणेप्रमाणे असे

कागल ता. १६/०३/२०२६

प्रतिवादी नं. १

प्रतिवादी तर्फे वकील

प्रतिवादी नं. ३

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## प्रतिज्ञा

प्रतिवादी नं. १ अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार व. व. ५९, धंदा – घरकाम, रा. सोनाळी ता. कागल जि. कोल्हापूर प्रतिवादी नं. ३ शकुंतलाबाई भिमराव मोरे व.व. ६० धंदा – अंगणवाडी सेविका, रा. म्हाळुंगे ता. करवीर जि कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील कैफीयत मधील सर्व मजकुर आमचे प्रामाणिक माहिती व समुजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा आज मु. कागल ता. १६/०३/२०२६ इ. रोजी

अ सं पोवार
प्रतिवादी नं. १

शकुं श । भि मोरे
प्रतिवादी नं. ३

## ॲफिडेव्हिट

मी प्रतिवादी नं. १ अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार व. व. ५९, धंदा – घरकाम, रा. सोनाळी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील कैफीयत मधील सर्व मजकुर माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हिट आज मु. कागल, ता. १६/०३/२०२६ इ. रोजी

ॲफिडेव्हिट करणार
यांना मी ओळखतो

अ सं पोवार
ॲफिडेव्हिट करणार

Khot (Adv. V. A Khot)
ॲडव्होकेट

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. १ अहिल्याबाई संतु उर्फ संतराम पोवार व. व. ५९, धंदा – घरकाम, रा. सोनाळी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील कैफीयत मधील व ॲफिडेव्हिट मधील सर्व मजकुर माझे प्रामाणिक माहिती व समुजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा आज मु. कागल, ता. १६/०३/२०२६ इ. रोजी

अ सं पोवार

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Smt Ahilyabai Santu @ Santram powar
Age 59 of Sonali, Kagal who is
identified by Shri V. A. Khot Adv
.............whom I know personally
Dated :- 16/3/26

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.24 17:22:36 +0530